148

# गांधीवादी विचार

## GANDHIAN THOUGHTS

Volume-I



संपादक

डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड

149



| | | |
|---|---|---|
| 13 | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार—एक विश्लेषण<br>प्रा.डॉ.विठ्ठल निलकंठ ठावरी | 99 |
| 14 | ग्रामीण विकासात गांधीजीच्या विचारांची प्रासंगिकता<br>डॉ. दिपाली श्रीराम घोगरे | 108 |
| 15 | महात्मा गांधीजींची रामराज्याची संकल्पना<br>अमोल भाऊराव बंड | 111 |
| 16 | भारतीय संविधानातील उद्देशपत्रिकेचा अर्थ प्रा. डॉ. जे. टी. कांबळे | 116 |
| 17 | गांधींचे राजकीय विचार डॉ विजय कृष्णराव काळे | 120 |
| 18 | जागतिक शांतता आणि महात्मा गांधी<br>प्रा.एस.बी.चव्हाणके | 132 |
| 19 | म. गांधीचे ग्रामविकास अर्थव्यवस्थेसंबंधीचे आर्थिक विचार : एक विश्लेषण<br>प्रा. डॉ. पी. डी. हुडेकर | 140 |
| 20 | महात्मा गांधींचे स्त्री सुधारणा विषयक विचार<br>प्रा. क्षीरसागर संदिप शिवाजी | 147 |
| 21 | 'महात्मा गांधींच्या सामाजिक विचारांची प्रासंगिकता'<br>प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ | 153 |
| 22 | महात्मा गांधींच्या सामाजिक विचारांचे ऐतिहासिक महत्त्व<br>प्रा.डॉ. विलास फरकाडे | 162 |
| 23 | महात्मा गांधींचे आर्थिक विचार : एक अभ्यास<br>प्रा. डॉ. चंद्रशेखर क्षिरसागर | 168 |
| 24 | महात्मा गांधीजीच्या सत्याग्रह विचाराचे तत्वज्ञान<br>प्रा. एस.एस. तायडे | 174 |
| 25 | गाँधी का आर्थिक चिन्तन और भारतीय अर्थव्यवस्था<br>समीर कुमार गुप्ता | 178 |
| 26 | बाजारवाद से नही बल्कि गांधी के विचारों से बदलेगी दुनियाँ।<br>डॉ. अनुपकुमार सिंह | 184 |

# ग्रामीण विकासात गांधीजीच्या विचारांची प्रासंगिकता

डॉ. दिपाली श्रीराम घोगरे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. एच. एन. सिन्हा कला व वाणिज्य महाविद्यालय, पातुर

भारतातील सुमारे ७२ टक्के जनता ग्रामीण भागात राहत असल्याने जोपर्यंत ग्रामीण विकास होणार नाही तोपर्यंत आपण भारताच्या विकासाचा विचार करू शकत नाही आणि भारताच्या विकासाचा विचार गांधी विचाराच्या चिंतनाशिवाय पूर्ण होवू शकत नाही. कारण त्यांच्या इतका सर्वस्पर्शी विचार कोणत्याही चिंतनाने केलेला दिसत नाही. धर्म, नीती, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य, कायदा, शेती कोणतेही क्षेत्र असो, वैयक्तिक आत्मशांती पासून विश्वशांती पर्यंत, गावापासून विश्वापर्यंत प्रचंड आवाका गांधी विचारांनी व्यापला आहे आणि म्हणून भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी गांधी विचार मार्गदर्शक आहेत.

गांधी विचारातील एक विचार म्हणजे त्यांची ग्राम "स्वराज्याची संकल्पना" जी आजच्या ग्रामविकासाकरीता अतिशय उपयोगी ठरणारी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय राजवटीमुळे ग्रामीण समाजाची दूर्दशा झाली होती. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासनाला प्रयत्न करणे गरजेचे होते. या प्रयत्नांना दिशा दाखविण्याचे कार्य गांधी विचारांनी केले. गांधीजीनी मांडलेल्या 'ग्रामस्वराज्य' व स्वावलंबी खेडयांची संकल्पना, देशात पंचायत राजव्यवस्था आणि लोकशाही विकेंद्रीकरणास कारणीभूत ठरल्या. गांधीजीनी नेहमी पटवून दिले की, खरा भारत, खरी संस्कृती खेडयात आहे. परंतु खेडयातील जनता शहराकडे स्थलांतरीत होत आहे, खेडी ओस पडू लागले आहेत. गांधीजी म्हणाले होते की, "खेडी नष्ट झाली तर हिंदूस्थान नष्ट होईल त्यामुळे खेडयांचे पुरूज्जीवन व पुनर्रचना करणे आवश्यक आहे"- भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर घटनाकारांनी



गांधीजीच्या या विचारांचे औचित्य ओळखून ग्रामीण विकासाकरीता शासनकर्त्यांवर पंचायत राज व्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी झाली. गांधी विचार टाकली आणि गांधी विचारांची प्रासंगिकता स्पष्ट झाली. गांधी विचार तेव्हा जेवढे प्रासंगिक होते तेवढेच ते आजही प्रासंगिक वाटतात.

गांधीजींना लोकशाही विकेंद्रीकरण तर हवेच होते, त्याचबरोबर त्यांना अर्थसत्तेचे विकेंद्रीकरणही अपेक्षित होते. म्हणून त्यांनी स्वावलंबी खेडयांची संकल्पना स्पष्ट केली. त्यांची अशी धारणा होती की, "माझ्या स्वप्नातील स्वराज्य हे गरीबांचे स्वराज्य असेल, जीवनांच्या ज्या गरजांचा उपभोग श्रीमंत घेतात, त्या सर्व गरजा गरीबांना सुलभ व्हाव्यात अशा राज्यात जाती, धर्मावर आधारीत भेदांना कोणतेच स्थान नसावे, हे स्वराज्य सर्वांच्या कल्याणासाठी असावे". राष्ट्र उभारणीत तर त्यांनी खेडयांना महत्वपूर्ण घटक मानले. खेडी जेव्हा स्वयंपूर्ण होतील, स्वावलंबी होतील तेव्हाच खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास होईल. त्याकरीता गांधीजींनी मांडलेली पंचायत राज व्यवस्था आपण स्थापन केली. पंचायत राजच्या माध्यमातून ग्रामीण विकासाकरीता अनेक योजना राबविल्या जातात. त्यात कृषिविषयक योजना, रोजगार योजना, महिला विषयक योजना, ग्राम सडक योजना, सार्वजनिक आरोग्य व ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम अशा विविध क्षेत्रातील योजना शासन राबवित आहे. योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा काही अंशी विकास होण्यास निश्चितच हातभार लागला. परंतु ग्रामीण विकासाची यशसिध्दी झाली असे म्हणने चुकीचे ठरेल. स्वातंत्र्यानंतरच्या सहा दशकाचा आढावा घेतल्यानंतर महात्मा गांधीच्या स्वप्नातील ग्राम स्वराज्य स्थापन झाले नाही असे खेदानेच म्हणावे लागते, कारण शासनाद्वारा राबविल्या जाणाऱ्या योजना साध्याभोळया ग्रामीण जनतेपर्यंत पोहचतच नाहीत. त्यामुळे या योजना ग्रामीण जनतेकरीता आहेत की अधिकारी, पदाधिकाऱ्यां करीता आहेत असा संभ्रम निर्माण होतो.

ज्या उद्देशाने गांधीजींनी लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना मांडली त्या ग्रामविकासाविषयी पंचायत राज व्यवस्थेतील लोक प्रतिनिधी भारावलेले आहेत का? असा प्रश्न पडतो. समाजाच्या कल्याणाकरीता ग्रामीण राजकारणात वैयक्तिक स्वार्थ, जातीपातीचे राजकारण, गुन्हेगारी अशा वाईट प्रवृत्तींचो

घुसखोरी झाल्याने पंचायत राज व्यवस्थेची प्रतिष्ठाच धोक्यात आली आहे. सामाजिक हिंसेचे बिज समाजात जागोजागी पेरले जात आहे. ग्रामविकास आणि पर्यायाने देश विकासाकडे दूर्लक्षच होत आहे. या परिस्थितीचा फायदा घेवून भ्रष्ट राजकारणी आपली पोळी भाजून घेत आहेत. आणि ग्रामीण जनता मात्र भरडली जात आहे. हे सर्व पाहून पुन्हा आठवतात ते गांधीजी आणि त्यांचे विचार त्यांनी राजकारणात सत्य व अहिंसेची झालर लावून राज्याला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले होते. त्या नैतिक आधाराची आजच्या अधःपतीत समाजाला पुन्हा एकदा गरज आहे.

एकीकडे भारताला महाशक्ती बनवण्याची स्वप्न पाहतांना खेडयातून ग्रामोद्योग नाहीसे झाल्याचे त्यांच्या होत चाललेल्या ऱ्हासाकडे दूर्लक्ष करून चालणार नाही. खेडयांची दयनीय अवस्था पाहून स्वातंत्र्यपूर्व काळाजी पुनरावृत्ती होईल की काय अशी भीती वाटायला लागते आणि पुन्हा आठवतात गांधीजी, त्यांचा संदेष ष्खेडयाकडे चलाष कारण खेडयातील गरीब लोकांना परदेशी कंपन्या लुटत आहेतच त्याच बरोबर शहरवासी बांधवही लुटत आहेत. अन्नदाता स्वतः उपाशी मरतांना दिसतो. तेव्हा शासनाला परत एकदा आठवण होते गांधीप्रणीत स्वावलंबी खेडयाची. जिथे समतोल आहात, चांगली घरे, शिक्षण व आरोग्याच्या सोई गावातच असतील. त्याकरीताच शासन रोजगार हमी योजना, घरकूल योजना, बचत गट योजना यासारख्या योजना राबवत आहे. गांधीजींच्या ग्रामस्वराज्याच्या प्रेरणेतून तंटामुक्त गाव योजना, हगणदारी मुक्त गाव योजना, ग्राम स्वच्छता अभियान यासारख्या योजना आकार घेत आहेत. बचत गटाच्या माध्यमातून पुन्हा एकदा गांधी प्रणीत कुटीरोद्योग व ग्रामोद्योगाच्या उदयाची चाहूल लागली आहे. गरज आहे ती फक्त या योजना प्रामाणिकपणे राबविल्या जाण्याची. त्यासाठीही पुन्हा गांधीजींचे सत्याचे व सत्याग्रहाचे तत्वज्ञानच कामी येईल यात शंका नाही. सत्ताधारी जर जनतेला जुमानत नसतील तर सत्याग्रहाच्या मार्गाने त्यांना वठणीवर आणायचा जो मार्ग गांधीजींनी दाखवला तो भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जगाला तारणारा आहे.

एकंदर गांधीजींच्या ष्ग्राम स्वराज्यष व स्वावलंबी खेडयाविषयी विचारांचे चिंतन केल्यानंतर एक गोष्ट लक्षात येते की, महात्मा गांधीजींच्या या विचारांची प्रस्तुतता ग्रामीण विकासाकरीता नेहमीच राहणार आहे. कारण मानवाच्या सुखी जीवनाचा शोध हाच गांधी विचारांचा केंद्रबिंदू होता. त्यामुळे त्यांचे विचार ग्रामीण विकासाकरीता नेहमीच मार्गदर्शक राहतील.